# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १९/२०२२

**विषय : मार्च/एप्रिल, २०२२ (नियोजन जून, २०२२) सम सत्र परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंसमवेत महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षेच्यासंदर्भात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या २०२२ मधील सम सत्राच्या व इतर परीक्षा (पदवी/पदव्युत्तर) या ऑफलाईन पारंपारिक पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

२. नियमित सम सत्राच्या परीक्षेमधील दोन पेपरमध्ये किमान दोन दिवसांचे अंतर ठेवण्यात येणार आहे.

३. लेखी परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक तासामागे १५ मिनिटांचा अतिरिक्त वेळ वाढवून देण्यात येत आहे.

४. विद्यार्थी ज्या पॅटर्नमध्ये परीक्षा देणार आहेत त्याच पॅटर्नमधील प्रश्नसंच विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

५. दिवसभरातील सलगच्या दोन पेपरमध्ये एक तासाचे अंतर ठेवण्यात येणार आहे.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील माहितीचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकाचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

संदर्भ : परीक्षा-समन्वय/१५४<br>
दिनांक : ०५ जून, २०२२

(डॉ.महेश काकडे)<br>
संचालक<br>
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक<br>
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,<br>
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा